महाराष्ट्र शासन
**शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय**
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
पिंपळगाव , ता.कागल, जि.कोल्हापूर पिन नं 416216
दुरध्वनी क्र. 7774048512
Email-ghmckolhapur@gmail.com

जा.क्र.शा.हो.म/243/२०२६ दि 16-03-2026.

कार्यालयीन आदेश

विषय -:महाविदयालयात रिक्त असलेल्या निवासी वैदयकीय अधिकारी व वैदयकीय अधिकारी पदांवर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणुक करणेबाबत.

संदर्भ -: १ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक एचएमसी- २०२४/ प्र.क्र.४१६ /२४/शिक्षण-१ दि.०८.१०.२०२४

२ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक आयुसे-०१२५/ प्र.क्र.०९ /९४२३९३/आयु-१- दि. २८.११.२०२५

३ महाविदयालयाची जाहिरात दि १४.०१.२०२६

४ कार्यालयाने घेतलेली मुलाखत दि. ०२.०३.२०२६

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये या महाविदयालयात रिक्त असलेल्या अध्यापकीय पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी दि ०२.०३.२०२६ रोजी घेण्यात आलेल्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आलेली होती.खाली अध्यापक व्यक्तीची निवड हि प्रतिक्षायादीतुन करण्यात आलेली आहे.

खालील उमेदवारास त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्य पदावर कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील उमेदवारास त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | नियुक्तीचा विषय व पदनाम |
|---|---|---|
| 1 | **डॉ. सुजीत स्वामी** | **Resident Medical Officer** |
| 2 | **डॉ. प्रतिक्षा लंगरे** | **Medical Officer** |
| 3 | **डॉ. सुरज चव्हाण** | **Medical Officer** |

**अटी व शर्ती-**

1- उपरोक्त कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिका-यांना खालील प्रमाणे प्रतिमहा मानधन अनुज्ञेय राहील. त्याव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

   1. निवासी वैद्यकीय अधिकारी- रु. 60,000/-
   2. वैद्यकीय अधिकारी- 50,000/-

2 कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा 11 महिन्याचा कालावधी अथवा वयाची 65 वर्षे यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.

3 कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्तावित मानकानुसार रुग्णसेवा, अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील. तसेच सदर वैद्यकीय अधिका-यांच्या उपस्थितीवर अधिष्ठाता यांचे थेट नियंत्रण राहील. त्यांनी नियमितपणे कर्तव्यावर पुर्णवेळ उपस्थित राहणे आवश्यक राहील.

4 वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील. रुग्णालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करतांना आढळुन आल्यास संबंधित उमेदवारांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

5 कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही कंत्राटी पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच कंत्राटी पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवाप्रयोजनासाठी विचारात घेतला जाणार नाही.

6 उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणुक या कारणासाठी नियुक्ती कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय संपुष्टात येईल.

7 उमेदवारास सार्वजनिक सुट्टी व रविवार याव्यतिरिक्त एका कॅलेंडर वर्षासाठी फक्त 08 नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत.

8 कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे माहिती व आधार सामग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

9 CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा कालावधी कर्तव्य कालावधी धरण्यात येणार नाही. त्याकरिता नियमाप्रमाणे नैमित्तीक रजा भरुन द्यावी लागेल अथवा सदर CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा दरम्यानच्या कालावधीचे वेतन कपात करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

10 कंत्राटी पध्दतीने नियुक्त वैद्यकीय अधिका-यांच्या कामकाजाचे मुल्यांकन अधिष्ठातामार्फत करण्यात येईल. त्यासाठी दर 3 महिन्यांनी उमेदवारांच्या कामकाजाचा तपशिलवार आढावा घेण्यात येईल.

11 संबंधित वैद्यकीय अधिका-यांना कामकाजाच्या संदर्भात मुल्यांकन करण्याच्या दृष्टीने अभिमत (feedback) घेण्यासाठी रुग्णालयीन कौशल्य, वक्तशिरपणा, सचोटी इ. निकषाच्या आधारे निश्चित करण्यात आलेले 10 गुणांच्या प्रश्नावलीवर गुणांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

12 रुग्णसेवेसंदर्भात अभिमत (feedback) घेण्यासाठी काही प्रसंगी रुग्णांकडून स्वतंत्र प्रश्नावलीच्या आधारे उमेदवारास पर्याप्त गुणांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

13 कंत्राटी पध्दतीने नियुक्त वैद्यकीय अधिका-यांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

14 वैद्यकीय अधिका-यांप्रमाणचे पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. तसेच त्यांचेप्रमाणेच कामाचे तास राहतील.

15 कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी 3 महिन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास 3 महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतरच त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करण्यात येईल.

16 कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा अधिष्ठाता यांचेकडून नियमितपणे घेण्यात येईल. तसा आढावा असमाधानकारक असल्यास संबंधित उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील.

17 कंत्राटी पध्दतीच्या उमेदवारांस अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच त्यांना पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील.

18 नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन 7 दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

19 शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणे, कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणे तसेच उमेदवारास प्रथम नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र/बंधपत्र तात्काळ सादर करणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner

20 रुग्णहित विचारात घेता एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही. तसेच शासन/ सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडून वेळावेळी प्राप्त निर्देश/ आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील.

21 उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) रुजु होते वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

22 अनुदान उपलब्धतेनुसार अनुज्ञेय मानधनाची रक्कम मिळेल त्यासाठी आपणास कोणत्याही प्रकारचा तगादा /तक्रार करता येणार नाही.

23 आपणास शासन निर्णय वै.शि.व औ.द्र.विभाग क्र.आयुसे-1120/प्र.क्र.89/आयु-1, दि.07.09.2022 अन्वये विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

(वैद्य अभिजीत अहिरे)
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय,व रुग्णालय
ता.कागल,जि.कोल्हापुर

Scanned with OKEN Scanner